आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२० फेब्रुवारी २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अमेरिकेच्या नेतृत्वाखाली होत असलेला आंतरराष्ट्रीय करार पॅक्स सिलिकाचं सदस्यत्व भारतानं स्वीकारलं

- अणु कार्यक्रमाबाबत तह करावा अन्यथा परिणामांना तयार रहावं असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांचा इराणला इशारा

- देशातल्या आठ प्रमुख उद्योग क्षेत्रांच्या एकत्रित निर्देशांकांत गेल्या महिन्यात ४ टक्के वाढ

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत उद्यापासून सुपर एटमधल्या लढती

**आणि**

- महिला क्रिकेटमधे भारत आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अमेरिकेच्या नेतृत्वाखाली होत असलेला आंतरराष्ट्रीय करार पॅक्स सिलिकाचं सदस्यत्व भारताने स्वीकारलं आहे. नवी दिल्लीत आयोजित एआय इम्पॅक्ट परिषदेत या कारारवर स्वाक्षऱ्या झाल्या. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव आणि अमेरिकेचे भारतातले राजदूत सर्जियो गोर यावेळी उपस्थित होते. भारत अमेरिका व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर भारताने हे पाऊल उचलणं महत्त्वाचं मानलं जात आहे. आर्थिक आणि तंत्रज्ञान विषयक सहकार्य आणि पुरवठा साखळीला आधार यादृष्टीनं हा करार महत्त्वाचा आहे.

या करारामुळे संगणकीय चिप्स सेमीकंडक्टर्स उद्योगात भारताला मोठा फायदा असल्याची प्रतिक्रीया अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केली.

**- -होल्ड- बाईट वैष्णव - - -**

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत इंडिया एआय इम्पॅक्ट समिटच्या निमित्ताने लिकटेनस्टाईनचे राजपुत्र प्रिन्स अलोईस यांच्याबरोबर द्विपक्षीय बैठक घेतली. या बैठकीत दोन्ही नेत्यांनी विविध क्षेत्रातल्या द्विपक्षीय सहकार्याचा आढावा घेतला. युरोपीयन मुक्त व्यापार करार आणि आर्थिक भागीदारी कराराच्या प्रगतीविषयी तसंच, भारत आणि लिकटेनस्टाईन दरम्यान व्यापार, गुंतवणूक आणि एआय, नवोन्मेष आणि कौशल्य विकास यांसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सहकार्याला चालना देण्यावर त्यांनी सहमती दर्शवल्याचं परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटलं आहे. या समिट दरम्यान प्रधानमंत्र्यांनी स्लोवाक प्रजासत्ताकचे अध्यक्ष पीटर पेलेग्रिनी यांच्याशी गुंतवणूक डिजीटल तंत्रज्ञान, संरक्षण, अंतराळ, ऊर्जा, संस्कृती यांसारख्या क्षेत्रात सहकार्य वाढवण्यासंदर्भात चर्चा केली. श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांच्याशीही मोदी यांनी द्विपक्षीय बैठक घेतली आणि उर्जा, दूरसंचार, पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा, कौशल्य विकास, संस्कृती, सागरी अर्थव्यवस्था आणि इतर क्षेत्रात सहकार्यांच्या मार्गावर चर्चा केली. मॉरिशसचे प्रधानमंत्री डॉ. नवीनचंद्र रामगुलाम यांच्याशीही मोदी यांनी द्विपक्षीय चर्चा केली. दोन्ही नेत्यांनी भारत-मॉरिशस धोरणात्मक भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठी वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस आणि प्रधानमंत्री मोदी यांच्यात ग्लोबल साउथविषयी चर्चा झाली.

<><><><><>

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना जागतिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतीत व्हावा या उद्देशाने जागतिक कृषी क्षेत्रातली कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदारांचं शिखर संमेलन येत्या रविवारपासून मुंबईत आयोजित सुरु होणार आहे. राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज ही माहिती दिली. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत कृषी क्षेत्रातले जागतिक तज्ञ,

कृषी आणि कृषीसंलग्न क्षेत्रातले नवे स्टार्टअप, गुंतवणूकदार, वित्तीय संस्था सहभागी होणार आहेत.

<><><><>

इराणनं अणु कार्यक्रमाबाबत तह करावा अन्यथा परिणामांना तयार रहावं असं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी बजावलं आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी इराणला १० ते १५ दिवसांची मुदत देत असल्याचं जाहीर केलं. मध्यपूर्वेतल्या अमेरिकी तळांवर सैन्याची जमवाजमव झाल्याने परिसरात भूराजकीय संघर्षाची शक्यता निर्माण झाली आहे.

दरम्यान इराण अमेरिकेच्या लष्करी आक्रमणाला तोडीस तोड उत्तर देईल असं इराणचे संयुक्त राष्ट्रातले राजदूत अमीर सईद इरावनी यांनी सांगितलं आहे.

<><><><>

भारत आणि अमेरिका यांच्यातल्या व्यापार करारावर मार्चमध्ये स्वाक्षरी होण्याची शक्यता असून येत्या एप्रिलपासून तो लागू होईल, असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी आज सांगितलं. भारताचे ब्रिटन आणि ओमानबरोबरचे मुक्त व्यापार करारही एप्रिलपासूनच लागू होण्याची शक्यता गोयल यांनी व्यक्त केली आहे. न्यूझीलंडबरोबरचा करार सप्टेंबरमध्ये लागू होईल.

भारत-अमेरिका कराराच्या मसुद्याला अंतिम स्वरुप देण्यासाठी दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांमध्ये येत्या सोमवारी अमेरिकेत बैठक होणार आहे. व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करणं व्यावसायिक दृष्ट्या व्यवहार्य ठरणार असेल तर ते खरेदी करण्याचा विचार भारत करेल, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी या संदर्भातल्या वार्ताहर परिषदेत सांगितलं.

<><><><>

देशातल्या आठ प्रमुख उद्योग क्षेत्रांच्या एकत्रित निर्देशांकांनं गेल्या महिन्यात ४ टक्के वाढ नोंदवली आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं जारी

केलेल्या आकडेवारीनुसार सिमेंट उत्पादनात १० पूर्णांक ७ दशांश टक्के वाढ झाली. पोलाद उत्पादनात ९ पूर्णांक ९ दशांश, वीज ३ पूर्णांक ८ दशांश, खतं ३ पूर्णांक ७ दशांश, तर कोळसा उत्पादनात ३ पूर्णांक १ दशांश टक्के वाढ झाली.

मात्र, कच्च्या तेलाच्या उत्पादनात ५ पूर्णांक ८ दशांश, तर नैसर्गिक वायु उत्पादनात २ पूर्णांक ८ दशांश टक्के घट झाली.

<><><><><>

टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सुपर एट गटाचे सामने उद्यापासून सुरु होतील. पहिला सामना पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यात होणार आहे. कोलंबो इथं संध्याकाळी ७ वाजता हा सामना सुरु होईल.

भारत, वेस्ट इंडीज, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, श्रीलंका, न्यूझीलंड, झिंबाब्वे, आणि पाकिस्तान हे देश सुपर एटमधे पोहोचले आहेत. भारताचा सामना येत्या रविवारी, दक्षिण आफ्रिकेबरोबर अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर होणार आहे.

सुपर एट फेरीत न पोहोचलेले ऑस्ट्रेलिया आणि ओमान यांच्यातला सामना आज श्रीलंकेत पल्लिकल इथं सुरु आहे. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे, भारतानं आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्थान मिळवलं आहे. आज बँकॉक इथं झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात भारतानं श्रीलंकेवर ५ गडी राखून दणदणित विजय मिळवला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला उतरलेल्या श्रीलंकेचा डाव २ चेंडू बाकी असतानाच ११८ धावात आटोपला. भारतातर्फे कर्णधार राधा यादवनं ४, तर तनुजा कंवर आणि प्रेमा रावत यांनी प्रत्येकी २ बळी मिळवले. त्यानंतर भारतानं ११९ धावांचं विजयी लक्ष्य ५ गड्यांच्या मोबदल्यात १४ व्या षटकातच पूर्ण केलं.

राधा यादवनं नाबाद ३१ धावा करत फलंदाजीतही मोलाचं योगदान दिलं. ती सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

**<><><><><>**

देशातल्या सर्व महामार्गांवरच्या टोल नाक्यांवर रोखीनं टोल घेण्याची पद्धत बंद करण्याचा सरकारचा विचार आहे. येत्या १ एप्रिलपासून फास्टॅग आणि युपीआय सारख्या डिजिटल माध्यमातूनच टोल स्वीकारला जाईल असं राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने म्हटलं आहे. टोल नाक्यांवरची गर्दी कमी करणं, टोलवसुलीत पारदर्शकता, आणि वाहनचालकांचा वेळ वाचावा यादृष्टीने हा बदल फायदेशीर ठरेल असं प्राधिकरणानं म्हटलं आहे. देशातल्या सर्व अकराशेपन्नास टोलनाक्यांवर हा नियम लागू होईल.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीतल्या सेवा तीर्थ इथं आरोग्य सेवा, सायबर सुरक्षा, अवकाश आणि इतर क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डीपटेक स्टार्ट अप्सच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी संवाद साधला. १६ कंपन्यांचे कार्यकारी अधिकारी आणि संस्थापकांनी या वेळी त्यांच्या कल्पना आणि कार्याची माहिती या बैठकीत दिली.

**//<><><><><>//**